**मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका,नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**

शासन आदेश :- संलेको -२०२३/ प्र.क्र.३४/ कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- २० फेब्रुवारी, २०२३.

**वाचा :-** वित्त विभाग,शासन आदेश क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.५/कोषा प्रशा-२, दि.२५/०१/२०२२.

**-: शासन आदेश :-**

नागपूर महानगरपालिका,नागपूर येथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदी कार्यरत असणारे श्री.विजय कोल्हे हे दिनांक ३१/१२/२०२१ रोजी शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका,नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक २५/०१/२०२२ च्या शासन आदेशान्वये श्री.विलीन खडसे,मुख्य लेखा व वित्त अधिकारी,नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात आलेला आहे. आता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका,नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सहसंचालक संवर्गातील अधिकारी श्रीमती मोना कृ. ठाकूर,सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,नागपूर विभाग,नागपूर यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात येत आहे.

२. श्रीमती ठाकूर, यांनी त्यांच्या सध्याच्या कार्यरत पदाचा नियमित कार्यभार सांभाळून मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका,नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ता. र. पवार)
अवर सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) अ.मु.स. (ले.व को.), यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (वित्त), यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त,नागपूर महानगरपालिका,नागपूर.*
४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.*
४) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.*
५) संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय,नवी मुंबई.*
६) संबंधित अधिका-यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७) श्रीमती मोना कृ. ठाकूर,सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,नागपूर विभाग,नागपूर. *
८) श्री.विलीन गो.खडसे,मुख्य लेखा व वित्त अधिकारी,नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर.*
९) निवडनस्ती कोषा प्रशा- २, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत )

0238/2023/345
21/2